# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष–२ ■ अंक–१८ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ५ डिसेंबर २०२२ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# सहा महिन्यात ठाणे खड्डेमुक्त, कचरामुक्त आणि सौंदर्यीकरणाने नटलेले दिसेल –मुख्यमंत्री

ठाणे : ठाणे शहराचा विकास हा झपाट्याने होत असून या शहरातील बदल हे नागरिकांना दिसायला सुरूवात झाली आहे. ठाणे बदलत आहे, ठाण्यात विविध सेवासुविधा प्राप्त होत आहेत, ठाण्याच्या विकासामध्ये महापालिकेबरोबरच नागरिकांचा सहभाग देखील महत्वाचा असून ठाण्याचा विकास हा वेगवान पध्दतीने होणार असून येत्या सहा महिन्यात ठाणे शहर हे खड्डेमुक्त, कचरामुक्त, स्वच्छ आणि सौंदर्यीकरणाने नटलेले दिसेल असा विश्वास मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांनी 'मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे' या अभियानाच्या शुभारंभाप्रसंगी व्यक्त केला. यावेळी अभियानाची ध्वनीचित्रफितही मुख्यमंत्र्याच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आली.

ठाणे महापालिकेच्या कै नरेंद्र बल्लाळ सभागृहात 'मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे' या अभियानाचा शुभारंभ शनिवारी आयोजित करण्यात आला होता

स्वच्छ व सुंदर ठाणे, खड्डेमुक्त ठाणे व स्वच्छ शौचालय यांचा समावेश या अभियानात आहे. स्वच्छ व सुंदर ठाणे अंतर्गत शहरातील सर्व रस्ते, सार्वजनिक जागा, पर्यटन स्थळे कायमस्वरुपी स्वच्छ ठेवणे, नेहमी कचरा पडणाऱ्या शहरातील सर्व जागा कचरामुक्त करुन त्या सर्व ठिकाणी सौंदर्यीकरण करणे, डेब्रिजमुक्त ठाणे शहर, शहरातील रस्ते, उड्डाणपूल यांची यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करणे, शहराच्या स्वच्छतेत महत्वाचे योगदान देणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य देणे व सफाई कामगारांसह त्यांच्या कुटुंबियांची महापालिका रुग्णालयात मोफत आरोग्य तपासणी करणे असे सहा महिन्याचे अभियान राबविण्यात येणार असून स्वच्छ व आरोग्यदायी ठाणे शहर निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.

ठाणे शहर सौंदर्यीकरणाअंतर्गत शहरातील प्रवेशद्वार (एन्ट्री गेटस्), शिल्पाकृतीसह चौक सुशोभिकरण, रस्ते सुशोभिकरण, भित्तीचित्रे, डिव्हायडर व कर्ब स्टोनची रंगरंगोटी, थर्मो प्लस्टिक पेंटद्वारे लेन मार्किंग व झेब्रा क्रॉसिंग, उड्डाणपुल, पादचारी पूल, खाडीवरील पूल, शासकीय इमारतींची रंगरंगोटी व विद्युत रोषणाई, मियावाकी तंत्रज्ञानाचा वापर करुन वृक्ष लागवड करुन स्वच्छतेसोबत सौंदर्यात भर पडणार आहे

हे अभियान देखील सहा महिने कालावधीत राबविण्यात येणार असून १०.७० कि.मी रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करणे, ५५.६८ कि.मी रस्त्याचे यू.टी.डब्ल्यू.टी पध्दतीने काम करणे व ७५.४४ कि.मी रस्त्यांचे डांबरीकरण पध्दतीने पुर्नपृष्ठीकरण करण्याचे काम करण्यात येणार आहे.

सहा महिने राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ शौचालय अभियानामध्ये शहरातील सर्व शौचालये २४ तास स्वच्छ ठेवणे, आवश्यक त्या सर्व शौचालयात केअरटेकर उपलब्ध करणे, शौचालयात सर्व मुलभूत सोयीसुविधांसह साधनसामुग्री उपलब्ध करणे. महापालिका मुख्यालयातील सर्व शौचालयातील आमूलाग्र बदल करणे आदी कामे प्रामुख्याने करण्यात येणार आहे.



## बदलते ठाणे अभियानाचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शुभारंभ

## सहा महिन्यात ठाण्याचे चित्र नक्कीच पालटलेले दिसेल – आयुक्त बांगर

*ठाणे महानगरपालिकेच्यावतीने तसेच एमएमआरडीए व इतर संस्थांच्यावतीने अनेक प्रकल्प सुरू आहेत. ठाणे शहरात ज्या समस्या आहेत त्या सोडविण्याचा प्रयत्न सुरू असून त्याची फलश्रुती दिसायला सुरूवात झाली आहे. नागरिकांच्या रोजच्या जीवनाशी संबंधित असलेल्या समस्या कालबद्ध पध्दतीने कशा सोडवता येतील यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. स्वच्छ शहर व सौंदर्यीकरण यावर भर देण्यात येत आहे. स्वच्छ व सुंदर शहर ठेवण्यासाठी महापालिकेसोबत नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहेच पण शहराबद्दल प्रत्येकाला अभिमान वाटला पाहिजे. खड्डे मुक्त शहर, शौचालयांची सुविधा याकडेही भर दिला जात असून या अभियानासाठी मुख्यमंत्र्यांनी निधी उपलब्ध करुन दिलेला असून त्या माध्यमातून हे अभियान राबविले जाणार आहे. मुख्यमंत्री यांची संकल्पना प्रत्यक्षात उतरण्यासाठी महापालिका अधिकारी कर्मचारी यांनी समर्पित भावनेने काम केले तर येत्या सहा महिन्यात ठाण्याचे चित्र पालटलेले नक्कीच दिसेल असा विश्वास महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी व्यक्त केला.*




# सातव्या वेतन आयोगामुळे महापालिकेवर पडणार आर्थिक बोजा

**ठाणे:** कोरोनामुळे ठाणे महापालिकेला एकीकडे आर्थिक परिस्थितीचा सामना करावा लागत असताना, त्यातच येत्या काही महिन्यात लागू होणाऱ्या ७ व्या वेतन आयोगाने महापालिकेच्या तिजोरीवर वार्षिक ११४ कोटी ७९ लाखांचा 'महा'बोजा पडणार हे मात्र जवळपास निश्चितच झाले. याशिवाय सहा वर्षातील वेतन वाढीपोटीची रक्कम ही महापालिकेला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना द्यावी लागणार आहे. ती रक्कम ही १०० ते १५० कोटींच्या आसपास जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे ७ व्या वेतन आयोगामुळे महापालिकेच्या तिजोरीवर अतिरिक्तच वाढीची टांगती तलवार लाटकताना दिसत आहे.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य सरकार आणि अन्य पालिका पात्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीबाबतचा निर्णय घेण्यासाठी सेवानिवृत्त सनदी अधिकारी के. पी. बक्षी यांच्या मार्गदर्शनाखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार मुंबई वगळून अन्य पालिकेतील कर्मचाऱ्यांना ही वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने तीन वर्षांपूर्वी घेतला होता. या निर्णयाची अंमलबजावणी ठाणे महापालिकेने केली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू झालेला नाही. यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमधून नाराजीचा सूर उमटत होता. या संबंधीचा प्रस्ताव प्रशासनाने सादर करताच त्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती. त्यानंतर पालिका प्रशासनाने हा प्रस्ताव राज्य शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविला होता. त्यास राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने मान्यता दिल्याने पालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू होण्याचा मार्ग मोकळा झाला असून या प्रस्तावाच्या अंतिम मंजुरीची प्रक्रीया पालिका स्तरावर सुरु आहे. येत्या काही महिन्यात हा वेतन आयोग लागू होण्याची शक्यता आहे. या आयोगानुसार महापालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेतनात १२ ते १५ टक्यांनी वाढ होणार असून यामुळे पालिकेच्या तिजोरीवर वार्षिक ११४ कोटी ७९ लाखांचा बोजा पडणार असल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली.

# मुंब्रा येथे गोवरमुळे बालकाचा मृत्यू

**ठाणे:** उत्तरप्रदेश येथून काही महिन्यांपूर्वी मुंब्रा येथे राहण्यासाठी आलेल्या दीड वर्षीय बालकाचा गोवर मुळे मृत्यू झाला. ठाण्यातील गोवरचा हा दुसरा बळी असून आठवड्यापूर्वी त्याच परिसरातील एका बालिकेचा मृत्यू झाला होता. त्या बालिकेप्रमाणे या बालकाने गोवरची लस घेतील नसल्याची बाब पुढे आली आहे.

मुंबईत तसेच आसपासच्या शहरांसह ठाणे शहरातही गोवर आजाराचे रुग्ण आढळून असून या पार्श्वभूमीवर सतर्क झालेल्या ठाणे महापालिकेने घरोघरी जाऊन सर्वेक्षण सुरु केले आहे. त्यात गोवरची लक्षणे असलेल्या रुग्णांचा शोध घेण्यात येत आहे. त्याचबरोबर गोवरची लस घेतलेली नाही अशा रुग्णांचा शोध घेऊन त्यांना लस देण्यात येत आहे. शीळ भागात एका साडे सहा वर्षाच्या बालिकेचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता मुंब्रा कौसा भागातील आरोग्य केंद्रात पुन्हा दीड वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाला असल्याची बाब समोर आली आहे. त्या बालकाला ताप आल्याने त्याच्या घरच्यानी खासगी डॉक्टरकडे उपचारासाठी नेले होते.

त्यावेळी तेथील डॉक्टरांनी कौसा आरोग्य केंद्रात जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर त्याला २३ नोव्हेंबर ला ठामपा पार्किंग प्लाझा येथे दाखल केले. मात्र, त्याची प्रकृती खालावल्याने त्याला २५ नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात हलविण्यात आले. २७ नोव्हेंबर रोजी त्याची प्रकृती अधिक खालावल्याने दुर्दैवी मृत्यू झाला.

**मागील अनेक दिवसांपासून आरोग्य विभागाकडून सुरू असलेल्या सर्वेक्षणाच्या वेळी कौसा आरोग्य केंद्राच्या हद्दीत एक घरात लहान मुले असल्याची माहिती लपविण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा परिचारिका (एएनएम) लसीकरण मोहिमेसाठी गेले असता, त्या घरात दोन बालके असल्याचे आढळून आले. यामध्ये मृत्यू पावलेल्या बालकासह अन्य एक बालक असल्याचे आढळून आले. यामध्ये मृत्यू झालेल्या बालकाने एकही लस घेतली नसल्याची बाब समोर आली आहे. तर, दुसऱ्या बालकाने एक लस घेतली असून लसीचा दुसरा डोस घेतला नसल्याची माहिती पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी दिली.**

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.



# पार्क केलेल्या रिक्षाला आग; अन्य दोन गाड्यांचेही नुकसान

**ठाणे:** मुंब्रा, बॉम्बे कॉलनी जवळील संतोष ग्राउंड या ठिकाणी पार्क केलेल्या रिक्षाला शुक्रवारी पहाटे पावणे चार वाजण्याच्या सुमारास आग लागली. या आगीची झळ तिच्या बाजूला पार्क केलेल्या अन्य दोन चारचाकी वाहनांना बसली आहे. अशाप्रकारे तीन वाहनांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही.

संतोष ग्राउंड या ठिकाणी पार्क केलेल्या वाहनांना आग लागल्याची माहिती मिळताच, घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेतली. तसेच लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू केल्यावर त्या आगीवर अर्ध्या तासात नियंत्रण मिळविण्यात यश आले. कोणी लावली किंवा कशी लागली हे अद्यापही समजू शकले नाही. मात्र आगीत तिन्ही वाहनांचे नुकसान झाले असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# ठाण्यातील बांबू वनाला आग

**ठाणे:** साकेत पोलीस ग्राउंड समोर असलेल्या बांबू वनाला आग लागल्याची घटना गुरुवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास समोर आली. आगीत बांबूच्या झाडांसह सुख्या पाला पाचोळ्याला आग लागली असून ही आग अवघ्या अर्ध्या तासात नियंत्रणात आणण्यात यश आले. यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नसून ही आग कोणीतरी जळती काडी किंवा सिगारेट अथवा बिडी फेकल्याने लागल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ठाण्यातील बांबू वनाला आग लागल्याची माहिती मिळताच घटनास्थळी शहर वाहतूक पोलीस, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी, वनविभागाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तसेच लागलेली आग अग्निशमन दलाच्या जवानांनी व आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने दुपारी १ वाजून ३५ मिनिटांच्या सुमारास पूर्णपणे नियंत्रणात आली. यावेळी ०१-रेस्क्यू वाहन ०१- वॉटर टँकर पाचारण केले होते अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# संजय पाटील यांचे निधन

**ठाणे:** जनकवी पी. सावळाराम कला समितीचे प्रमुख विश्वस्त संजय पाटील यांचे नुकतेच २९ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. जनकवी व ठाणे महापालिकेचे दिवंगत नगराध्यक्ष पी. सावळाराम यांचे ते ज्येष्ठ पुत्र होते. त्यांच्या पश्चात भगिनी डॉ. कल्पना पाठारे, पत्नी गीता,मुलगा ओंकार पाटील, मुलगी संपदा पाटील, सुन सुवर्णा, आणि नात असा परिवार आहे.



पाटील हे खासगी कंपनीतून सेवानिवृत्त झाले होते. ते जनकवी पी. सावळाराम कला समितीचे विश्वस्त म्हणून काम पाहत होते. यंदाही या पुरस्कार सोहळ्याची तयारीत ते व्यस्त असतांनाच अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# थकीत पाणीपट्टीच्या बिलाच्या दंडात्मक रकमेवर १०० टक्के सूट

## ३१ मार्च २०२३ पर्यंत अभय योजना सुरू राहणार



## ठाणेकर नागरिकांनी या योजनेचा लाभ घेवून पाणी बिलाचा त्वरीत भरणा करावा : आयुक्तांचे आवाहन

**ठाणे : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील थकीत घरगुती पाणीपट्टी बिलामधील प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट देणारी पाणीपट्टी कर अभय योजना जाहिर करण्याचा महत्वपूर्ण निर्णय महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेतला आहे. थकीत पाणीपट्टी बिलावर १०० टक्के इतकी भरीव सवलत जाहिर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहनही आयुक्तांनी केले आहे.**

डिसेंबर २०२२ ते ३१ मार्च २०२३ या चार महिन्यांच्या कालावधीत या अभय योजनेचा लाभ पाणीपट्टी थकबाकीदारांना घेता येणार आहे. ३१ मार्च २०२३ पर्यंतच्या थकीत पाणीपट्टी कराच्या दंडाची रक्कम पूर्णत: माफ करुन भरीव सूट देणारी थकबाकीदारांसाठी लाभदायी अशी ही योजना आहे. ही रक्कम थकबाकीदारांनी एकाचवेळी भरणा करावयाची असून ती टप्याटप्यांनी भरता येणार नाही याची नागरिकांनी नोंद घ्यावयाची आहे. त्याचप्रमाणे जाहीर केलेल्या अभय योजनेच्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नाही याचीही दखल घ्यावयाची आहे. त्यामुळे ३१ मार्च २०२३ पर्यंत नागरिकांनी आपली पाणी थकीत रक्कम भरणा करुन या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केले आहे.

या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती संयोजनधारकांनी पाणीपट्टी जमा केली असेल, अशा घरगुती नळसंयोजनधारकांना सदरची योजना लागू असणार नाही तसेच व्यावसायिक नळसंयोजन धारकांनाही ही सवलत लागू असणार नाही.

ठाणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मीटर पद्धतीने ७२,१२० तसेच नॉन मीटर पद्धतीने १,५३,२९५ असे एकूण २,२५,४१५ इतक्या संयोजनधारकांना पाणी देयके आकारण्यात आली आहेत. यामध्ये रुपये ९५.१३ कोटी इतकी मागील थकबाकी असून त्यावर रुपये ३८.७९ कोटी इतका प्रशासकीय आकार (दंड) आकारण्यात आला आहे. पाणी देयके वसुलीपोटी विभागामार्फत आतापर्यंत ४३१६ इतकी नळसंयोजने खंडीत केली असून ९७ मोटर / पंप रुम्स सील करण्यात आले आहेत. अशा प्रकारची व यापेक्षा कठोर कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी पाणी देयकाचा भरणा त्वरीत करुन महापालिकेस सहकार्य करावे व प्रशासकीय आकार (दंड) माफीचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

नागरिकांनी पाणीपट्टी बिलाची देयके ठाणे महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागसमिती कार्यालयात जमा करावीत. तसेच नॉन मीटर पद्धतीच्या पाणी देयकांसाठी महापालिकेच्या https://watertax.thanecity.gov.in या संकेतस्थळावर तसेच मीटर पद्धतीसाठी https://tmcswmb.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

# आरटीईची योजना चांगली पण, भ्रष्ट यंत्रणेमुळे बरबटली!

## गणपती गेले, नवरात्र, दिवाळी झाली तरी पालकांची वणवण...

**ठाणे:** शैक्षणिक वर्ष संपत आले तरी ठाण्यात आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया रखडलेली असल्याचे समोर आले आहे. ठाण्यातील कासारवडवली येथील युरोस्कूल या नामांकित शाळेने शिक्षण उपसंचालकांनी निर्णय देऊनही ३५ विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत प्रवेश नाकारला आहे. याची गंभीर दखल घेत आमदार संजय केळकर यांनी शिक्षण अधिकाऱ्याची कानउघाडणी केली असुन अशा मुजोर शाळांची मान्यता रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच, डावलण्यात आलेल्या २३ विद्यार्थ्यांना शाळांमध्ये सामावुन घेण्यात यावे. असे बजावले आहे. अन्यथा, आगामी अधिवेशनात शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्या या भ्रष्ट यंत्रणेचा पर्दाफाश करणार असल्याचा इशारा आ. केळकर यांनी दिला आहे.

### आ. संजय केळकर यांच्याकडुन अधिकाऱ्यांची कानउघाडणी

केंद्र सरकारने २००९ साली राईट टू एज्यूकेशन म्हणजेच आरटीई कायद्याअंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद केली. या कायद्यानुसार खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागा वंचित आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. त्यानुसार , शिक्षण विभागाने २०२२-२३ या शैक्षणिक सत्राकरीता युरो शाळेत प्रवेशासाठी आरटीई अंतर्गत ९५ विद्यार्थ्यांची प्रवेश यादी जाहिर केली.मात्र युरो शाळेने प्राधान्यक्रम डावलुन केवळ ६० विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला. उर्वरीत ३५ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारल्याने या विद्यार्थ्यांच्या पालकांची नाहक ससेहोलपट सुरु आहे. या जाचाला कंटाळुन १२ विद्यार्थ्यांच्या पालकांनी इतरत्र प्रवेश घेतला. तर उर्वरीत २३ बालकांचे पालक गेले ५ महिने वणवण भटकत आहेत. ही बाब पालकांनी आ. संजय केळकर यांच्या कानी घालताच आ. केळकर यांनी शिक्षणाधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. तसेच, शिक्षणमंत्री आणि शिक्षण सचिवांकडे हा विषय मांडला. त्यावर शाळांवर कारवाई करण्यासह शाळांची मान्यता रद्द करावी, आणि वगळलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देण्याची मागणी मान्य केल्याचे सांगितले.

### प्रशासनाचा बट्ट्याबोळ की शाळेची मुजोरी?

ठाण्यातील युरो स्कुलमध्ये प्रवेशापासुन वंचित राहिलेल्या पालकांनी मंगळवारी आ. केळकर यांची भेट घेऊन गा-हाणे मांडले.यात ठाणे मनपासह जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे आणि शिक्षण उपसंचालक ते राष्ट्रीय बालहक्क आयोगाकडे दाद मागितल्याचा लेखाजोखा मांडला.यात शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यांनी जुलै महिन्यातच सुनावणी घेऊन आठ दिवसात वगळलेल्या २३ बालकाना प्रवेश देण्याचे आदेश युरो शाळेला दिले. मात्र, शिक्षण विभागाच्या आदेशानाही शाळेने केराची टोपली दाखवल्याचे आरोप पालकांनी केले. तेव्हा, हा प्रशासनाचा बट्ट्याबोळ आहे की शाळेची मुजोरी असा सवाल उपस्थित होत असुन याप्रकरणी अधिवेशनात आवाज उठवणार असल्याचा इशारा आ. केळकर यांनी दिला आहे.

## ज्योती पाटील यांच्याकडून गृहिणींना रोजगाराची संधी उपलब्ध



**तन्वी फाउंडेशन यांच्या माध्यमातून दिवा शहरातील महिलांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.सामान्य कुटुंबातील महिलांना घरबसल्या ही कामे करणे शक्य असून १७ प्रकारची विविध कामे ज्योती पाटील यांनी महिलांसाठी उपलब्ध करून दिली आहेत.ज्योती पाटील यांनी महिलांना रोजगार उपलब्ध करून दिल्याने अनेक महिलांनी पाटील यांचे आभार मानले आहेत.गृहिणी असणाऱ्या अनेक महिला या संधीचा लाभ घेत आहेत.**



**पनवेल मधील जगदिश गायकवाड याने आंबेडकर घरण्यावर गलिच्छ शब्दात शिवीगाळ केल्याने त्याविरूध्द कायदेशीर कारवाई करावी, यासाठी वंचित बहुजन आघाडी दिवा विभागातर्फे मुंब्रा पोलिस ( दिवा चौकी) स्टेशनला निवेदन देण्यात आले.यावेळी शहर अध्यक्ष मिलिंद गवई ,दिवा पश्चिम अध्यक्ष अरविंद तांबे,महीला अध्यक्ष धनवे ताई, महासचिव रुपाली कांबळे,महीला उपाध्यक्ष दिपालीताई वाघ,ठाणे संघटक महेद्र हडकर,उपाध्यक्ष रवींद्र वाघ,दिवा सचिव नितेश इंगोले ,ठाणे शहर सचिव सुधाकरराव कांबळे ,दिवा संघटक विशाल तांबे उपस्थित होते**

# मुख्य रेल्वे प्रबंधकांसमोर प्रवाशांना भेडसवणाऱ्या समस्येचा खासदारांनी वाचला पाढा



***ठाणे:** मुंबईची लाईफ लाईन ओळखल्या जाणाऱ्या मध्य रेल्वे मार्गावरील ऐतिहासिक अशा असलेल्या ठाणे रेल्वे स्थानकात रेल्वे प्रवाशांचा वाढणारा अतिरिक्त भार व रेल्वे प्रवाशांना भेडसावणाऱ्या समस्या ठाणे लोकसभेचे खासदार राजन विचारे यांनी मध्य रेल्वे प्रबंधक रजनीश कुमार गोयल यांच्या दालनात आयोजित केलेल्या बैठकीत मांडल्या. त्यावेळी रेल्वे प्रशासन व महापालिका अधिकारी उपस्थित होते. त्याच समस्या घेऊन मध्य रेल्वे महाव्यवस्थापक अनिल कुमार लाहोटी यांचीही भेट घेऊन त्यांच्याही निदर्शनास आणून दिल्या.*

ठाणे रेल्वे स्थानक हे मध्य रेल्वे मार्गावरील मुंबई नंतर रेल्वे प्रशासनाला जास्त उत्पन्न मिळवून देणारे स्थानक आहे. या रेल्वे स्थानकातून दररोज ६ ते ८ लाख प्रवासी ये -जा करीत आहेत.

नवी मुंबई येथे जाणारे प्रवासी सुद्धा ठाणे रेल्वे स्थानकात उतरून हार्बर मार्गावरील नवी मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वेने प्रवास करीत आहेत. त्यामुळे ठाणे रेल्वे स्थानकात प्रवाशांची वाढणारी संख्या लक्षात घेता ठाणे - मुलुंड दरम्यान नवीन रेल्वे स्थानक व ऐरोली कळवा एलिव्हेटेड या प्रकल्पाची नितांत गरज असल्याचे सांगितले. त्यामुळे हे दोन्ही प्रकल्प जलद गतीने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आदेश दिले आहेत.

या बैठकीत ठाणे रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेस धोकादायक झालेली इमारत पाडण्यात आलेली आहे. त्या जागेवर नवीन इमारत उभी करण्यासाठी रेल्वे लाईन डेव्हलपमेंट (ठडऊ-) या विभागामार्फत आराखडा बनविण्याचे काम सुरू आहे. खासदार विचारे यांनी सुप्रसिद्ध वास्तु विषारद हितेन सेठी असोसिएट यांच्यामार्फत बनविलेल्या हेरिटेज लुक असलेल्या इमारतीचा आराखडा या बैठकीत सादर केला. लवकरच यास मान्यता मिळवून या इमारतीचे काम सुरु करू असे रेल्वे प्रशासनाने सांगितले.

**पादचारी पूल**

ठाणे रेल्वे स्टेशन येथे सुरू असलेले कल्याण व मुंबई दिशेस पादचारी पुलाचे काम संतपणे सुरू असल्यामुळे फलाटावरील पत्रे काढल्यामुळे प्रवाशांना ऊन-पावसामुळे त्रास सहन करावा लागत आहे. हे काम युद्धपातळीवरती सुरू करून प्रवाशांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यामुळे लवकरात लवकर पादचारी पुलाचे काम पूर्ण करण्यात यावे. तसेच या पुलाच्या उभारणीसाठी ठाणे महानगरपालिकेने रेल्वेला ८ कोटी वर्ग केलेले आहेत. उर्वरित रक्कम जमा करण्यासाठी खासदार राजन विचारे यांनी ठाणे महापालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करून उर्वरित रक्कम रेल्वेकडे लवकरात लवकर जमा करण्याची विनंती करण्यात आली आहे.

**प्रवाशांची सुरक्षा**

ठाणे रेल्वे स्थानकावर ६ ते ८ लाख प्रवाशांच्या सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून आर पी एफ सुरक्षारक्षक मनुष्यबळ ७० असल्याने खंत व्यक्ती केली असून सुरक्षारक्षक वाढविण्यात यावी. अशी विनंती खासदार राजन विचारे यांनी केली.तसेच ठाणे रेल्वे स्थानक परिसरात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्हीची संख्या वाढविण्यात यावी. त्याचबरोबर प्रवाशांना सोयीस्कर पडेल या दृष्टिकोनातून तक्रार निवारण केंद्र उभे करावे जेणेकरून रेल्वे स्थानकात होणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसू शकेल.

रेल्वे परिसरातील फेरीवाल्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी २४ तास प्लॅटफॉर्म व पादचारी पुलावरती आरपीएफची सुरक्षा असणे अनिवार्य असल्याचे तसेच रेल्वे व महापालिका नोडल ऑफिसरची नेमणूक करा अशी विनंती रेल्वे सुरक्षा आयुक्त शुक्ला यांच्याकडे खासदारांनी केली.

**यु टी एस प्रणालीची जनजागृती**
**(मोबाईल द्वारे तिकीट काढण्याची पद्धत)**

रेल्वे स्थानकात तिकीट खिडकी वरती पिकअवर्स मध्ये असणाऱ्या स्टाफची संख्या वाढविण्यात यावी किंवा रेल्वे प्रशासनाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे यु टी एस प्रणाली मार्फत तिकीट काढून घेण्याची सुविधा सुरू केली आहे. त्याचे एजन्सी मार्फत ठीक ठिकाणी जनजागृती कक्ष उभारून प्रवाशांना मोबाईल मार्फत तिकीट कसे काढता येईल यांचे मार्गदर्शन सोय उपलब्ध करून द्यावी त्यावर रेल्वेने सप्ताह सुरू करू असे आश्वासन खासदारांना दिले.

**रेल्वे बोर्डाकडे पाठपुरावा**

कोकणात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांचे दर एक्सप्रेस रेल्वे गाड्यांच्या दराप्रमाणे लागू केल्यामुळे मेमू रेल्वे गाड्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाढीव तिकिटाचा नाहक भार सहन करावा लागत आहे. यामुळे खासदार राजन विचारे यांनी मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे घेण्यात आलेल्या मध्य रेल्वे डीआरएम यांच्या सोबतच्या बैठकीत या विषयाला वाचा फोडून या संदर्भात रेल्वे बोर्डाकडे रेल्वे तिकिट दर कमी करण्याची मागणी केली.

**एल टी टी बनारस एक्स्प्रेसला**
**ठाणे स्थानकात थांबा देण्याची मागणी**

बनारस, जौनपुर, आजमगढ, येथे जाण्यासाठी १२१६७/१२१६८ एल टी टी बनारस एक्स्प्रेस या ट्रेन ला ठाणे स्थानकात येताना व जाताना ठाणे स्थानकात थांबा देण्याची मागणी खासदार राजन विचारे यांनी रेल्वे महाव्यवस्थापक यांच्याकडे केली आहे.

**शौचालयाची निर्मिती**

ठाणे रेल्वे स्थानक येथे भारतातील पहिले वातानुकूलित शौचालय बांधण्यात आले होते. ते शौचालय सुरू झाल्यापासून त्याची पाच वर्षाची निविदा संपेपर्यंत व्यवस्थित सुरळीत सुरू होते. निविदा संपल्यानंतर रेल्वेने वातानुकूलित शौचालय सुरू ठेवणे गरजेचे होते. परंतु त्याचे रूपांतर साध्या शौचालय मध्ये केले आहे ते शौचालय पुन्हा वातानुकूलित करून प्रवाशांना चांगली सुविधा देण्यात यावी अशी मागणी ही खासदार विचारे यांनी केली. यावेळी फलाट क्र. ७, ८ आणि ५, ६ मुंबई व कल्याण दिशेस दिव्यांग व महिलांसाठी नवीन स्वतंत्र शौचालयाची निर्मिती करण्यात आल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले. ठाणे स्थानकामध्ये काही वर्षांपूर्वी दोन लिफ्ट सुरू करण्यात आल्या होत्या लिफ्ट वारंवार बंद असल्यामुळे विशेष करून ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिलांना त्रास सहन करावा लागत आहे. हे निदर्शनास आणून दिले. तसेच मुंबई व नवी मुंबईकडे जाणाऱ्या लोकलच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्याची मागणी व लोकल ला एसी चे २ किंवा ३ डब्बे जोडण्याची मागणी खासदार राजन विचारे यांनी केली आहे.

# स्थानिकांना नोकऱ्या द्या, नाहीतर हॉस्पिटलला टाळा ठोकू







**ठाणे :** वर्तकनगर येथे नव्याने सुरु होत असलेल्या एका खासगी हॉस्पिटलमध्ये स्थानिक तरुण-तरुणींना नोकरी व रोजगार दिला नाहीतर हॉस्पिटल सुरु होण्याआधीच हास्पिटलला टाळा ठोकू ! असा इशारा ठाणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक व युवासेनेचे नेते पुर्वेश सरनाईक यांनी दिला.

ठाणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक व युवासेनेचे नेते पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातून शुक्रवारी स्थानिकांना नोकरी व रोजगार मिळावा यासाठी वर्तकनगर विभागात येथे नव्याने सुरु होत असलेल्या खासगी हॉस्पिटल येथे आंदोलन करून निवेदन देण्यात आले. त्यावेळी त्यांनी हा इशारा दिला आहे. या ठिकाणी स्थानिक तरुण-तरुणींना शैक्षणिक पात्रता असतानाही नोकरी/रोजगारासाठी डावलण्यात येत असल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून सरनाईक यांच्या जवळ करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत सरनाईक यांनी स्थानिकांसहित हॉस्पिटलला धडक दिली. यावेळी त्यांनी हॉस्पिटल व्यवस्थापनाला निवेदन दिले व या संदर्भात निर्णय घेण्यासंदर्भात ४८ तासांचा अवधी दिला आहे. जर व्यवस्थापनाने याची गंभीर दखल घेतली नाहीतर हॉस्पिटल सुरु होण्याआधीच हॉस्पिटलला टाळा ठोकू असा इशारा त्यांनी दिला आहे. यावेळी शिवसेना विभागप्रमुख रामचंद्र गुरव, शिवसेनेचे संदीप डोंगरे, भगवान देवकते, विराज निकम, सुशांत मयेकर, रमेश सांडभोर, संतोष ढमाले, जितीन सावंत, राकेश यादव, गणेश तांबे, विशाल कुडिया, राकेश जैस्वार, बाळू जाधव, तेजस फाटक, साई ढवळे, मनोज अहिर, सुजय पाटील, निलेश चव्हाण, निलेश कारंडे, प्रमोद भिसे, मछिंद्र सुतार आणि स्थानिक तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मी आरोपांना कामातून उत्तर देणार

## – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे :** आता आरोप करण्याची जणू स्पर्धा लागली आहे. सरकार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर. कारण काय तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पहाटेपर्यंत कामे करतात, आरोपांना मी काही उत्तर देणार नाही. मी कामांनी उत्तरे देणार आहे. तुम्ही आरोप करा,मी तेथे जास्त काम करणार असल्याचेही राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात शनिवारी झालेल्या कार्यक्रमात म्हटले.

याचदरम्यान वाड्या- पाखाड्यांचे टुमदार ठाणे आता बदलत आहे.जुने ठाणे आता आंतरराष्ट्रीय शहर होत आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. तसेच आपला कोणताही वैयक्तिक अजेंडा नाही. लोकांचे हिताचे निर्णय हेच महत्वाचे असून मुंबई आणि ठाणे खड्डेमुक्त करण्यासाठी विशेष अभियान घेण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

'मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे' या अभियानाचा शुभारंभ शनिवारी ठाणे महापालिकेच्या बल्लाळ सभागृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी विरोधकांकडून होत असलेल्या आरोपांना भीक घालणार नसल्याचे सांगतांना आपण करत असलेली कामे पाहून काही लोकांना त्रास होत असल्याचे म्हटले. मात्र एखादा मोठा उद्योग हा एका महिन्यात बाहेर जात नसतो मात्र सरकारवर आणि मुख्यमंत्र्यांवर आरोप करण्याची स्पर्धा लागली आहे कारण एकनाथ शिंदे हा पहाटे पर्यंत काम करतो म्हणून. या आरोपांना मी कामाने उत्तर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री आला काय गेला काय ही कोणाला चिंता नसते. मात्र नागरिकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण झाली आहे. मी झोपतो कधी यांची चिंता विरोधकांनी करू नये असेही त्यांनी सांगितले.

कॅबिनेट पहिल्याच बैठकीमध्ये फडणवीस आणि मी धाडसी निर्णय घेण्याचा निर्णय घेतला आणि ते सर्व निर्णय सर्वसामान्यांच्या हिताचे असतील. सिंचनाच्या बंद पडलेल्या १६ योजना सुरु केल्या आहेत. उद्योग क्षेत्रात २० हजार कोटींची गुंतवणूक होत आहे , त्यामुळेच राज्याचा विकास होत असल्याने त्यांना हा विकास पचत नसल्यानेच माझ्यावर टीका होत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मुंबई आणि ठाणे खड्डेमुक्त करण्याचेही त्यांनी जाहीर केले. या कार्यक्रमास आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के,मीनाक्षी शिंदे, पालिका आयुक्त अभिजित बांगर आदी उपस्थित होते.

उशिरा रात्री जरी ठाण्यात आलो तरी वेगळा आनंद मिळतो. त्यातच ठाण्याशी एक जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले त्यामुळे ठाण्यात आल्यावर आपल्याला शांत झोप लागते असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. मुंबईच्या जडणघडणीत ठाण्याचा ही हातभार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री कोण होईल याची उत्सुकता सर्वांना होती. पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांनी मला संधी दिली. कारण मी जोरदार आणि धाडसी असून धडाडीचे निर्णय घेणारा व्यक्ती होती हे त्यांनी ओळखले होते म्हणून. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र देवेंद्र फडणवीस यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले असल्याचे सांगत बाळासाहेब आणि आनंद दिघे यांच्या आशीर्वादानेच हे शक्य झाले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

ठाणे महापालिका आयुक्त अभिजत बांगर यांनी नवी मुंबईत माझी अपेक्षा पूर्ण केली.म्हणून त्यांना ठाण्याची जबाबदारी दिली. तत्कालीन आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांना देखील राज्याच्या महत्वाचा उद्योग विभाग एमआयडीसी देण्यात आला आहे. त्यामुळे ठाण्यात जे आयुक्त म्ह्णून येतात त्यांची पुढची सर्व दालने उघडी होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महापालिका आयुक्त बांगर यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह इतर मान्यवरांचे पुस्तक बुके देत आगळ्यावेगळ्या पद्धतीने स्वागत केले. ज्ञान गंगा आणण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे.

## दिवा पूर्वेकडील रेल्वे प्रवाशांना मिळणार दिलासा

# खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने सुरू होणार सरकत्या जिन्याचे काम

### दिवा पूर्वेतील नवीन तिकिट घराचे लवकरच होणार लोकार्पण





**दिवा** – दिवा स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशाची संख्या प्रचंड वाढली आहे. त्यामुळे उपलब्ध सुख-सुविधांवर प्रचंड ताण निर्माण झालेला आहे. दिव्यातील ९०% पेक्षा जास्त प्रवासी हे पूर्वेला राहत असले तरी दिवास्थानात पूर्व दिशेला एकही तिकिट घर अथवा एकही सरकता जिना नव्हता. त्यामुळे पूर्वेतील रेल्वे प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत होती.

## मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केला पाहणी दौरा



दिवा रेल्वे प्रवासी संघटना❊ गेली अनेक वर्ष वरील मागण्यांसाठी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत होती. खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी सदर गोष्टीचे गांभीर्य ओळखून दिवा स्थानकात पूर्व दिशेला तिकिट घर सरकते जिने व अन्य सुख सुविधा पुरवाव्यात यासाठी प्रशासनाकडे मागणी केली होती. त्याच अनुषंगाने दिवा पूर्व येथे रेल्वे प्रवाशांसाठी नवीन तिकिट घराचं काम सुरू होऊन ते पूर्णत्वास आले आहे आणि ते लवकरच प्रवाशांच्या सेवेकरिता सुरू होईल. असे असताना दिवा पूर्वेला देखील सरकते जिने असावेत जेणेकरून जेष्ठ प्रवासी व अन्य इतर प्रवाशांना त्याचा जास्त फायदा होईल या अनुषंगाने खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करून सरकता जिना मंजूर केला असून त्याचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. सदर दोन्ही कामांची पाहणी करण्यासाठी मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी सीनियर डी. ई.एन पैठणकर, ए.इ.एन श्री. शर्मा तसेच रेल्वे अधिकारी बळीराम सरोज व संबंधित विभागाचे अन्य रेल्वे अधिकारी दिवा स्थानकात दाखल झाले होते. यावेळी शिवसेना कल्याण ग्रामीण संघटक ब्रम्हा पाटील, क्षेत्रीय सल्लागार समिती सदस्य, मध्य रेल्वे तथा दिवा रेल्वे प्रवासी संघटना अध्यक्ष अँड.आदेश भगत, मा. नगरसेवक अमर पाटील, विभाग प्रमुख उमेश भगत, शाखाप्रमुख नितीन ओतूरकर तसेच दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे ❊प्रसाद भोईर, गणेश मोहिते, जितू गुप्ता, सुनील शिंदे, आकाश वसावे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मयेकर महाविद्यालयात एड्स निर्मूलन विषय पथनाट्यातून विद्यार्थ्यांनी केली जनजागृती!



**रत्नागिरी:–** मोहिनी मुरारी मयेकर कला व वाणिज्य महाविद्यालय चाफे येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत एड्स निर्मूलन दिन साजरा करण्यात आला.

समाजामध्ये असलेले गैरसमज दूर करण्याच्या हेतूने विद्यार्थ्यांच्या मनात एड्स हा संसर्गजन्य रोग नसून तो वैयक्तिक आजार आहे. त्यामुळे एचआयव्ही बाधित व्यक्तीला दुर्लक्षित न करता सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे आपण वागणूक देऊन मानसिक आधार देऊन जगण्याचे बळ देऊ शकतो हा संदेश पथनाट्यद्वारे शिरिष मुरारी मयेकर माध्यमिक विद्यालय व सुनील मुरारी मयेकर कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय येथे प्रेक्षकांना देण्यात आला. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक पल्लवी गावडे, चैताली गावडे, अमित घाणेकर, राहुल रेवाळे, दर्शन खापरे, दक्षता खापरे, साहिल वीर, चिन्मय इंदुलकर हे सहभागी होते.या कार्यक्रमाला मार्गदर्शन महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या स्नेहा पालये आणि राष्ट्रीय सेवा विभाग प्रमुख प्रा. अवनी नागले यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा.तेजश्री रेवाळे, सहाय्यक शिक्षक श्वेता पवार, सर्व सहकारी ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

## छ.संभाजी महाराज निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण

**रत्नागिरी:–** दरवर्षी गाव विकास समिती रत्नागिरी जिल्हा या संघटनेतर्फे जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.ही स्पर्धा छ.संभाजी महाराज यांच्या नावाने घेतली जाते.समजातील चालू घडामोडींवर विद्यार्थ्यांना बोलके करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन ग्रामीण विद्यार्थी संघटना करत असते.या वर्षी स्पर्धेचा विषय होता स्पर्धेचे युग आणि ग्रामीण भागातील शिक्षण पद्धती बदलाची गरज हा विषय पत्रकार तथा संघटनेचे संघटनप्रमुख सुहास खंडागळे यांनी दिला होता. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक शैलेश सुरेश जाधव याने पटकावला तर द्वितीय क्रमांक एकता घवाळी हिने पटकावला आहे. या दोन्ही विजेत्यांना रोख रक्कम व शिल्ड देऊन गौरविण्यात आले. तर ३ उत्तेजनार्थ क्रमांक काढण्यात आले. या मध्ये तेजस्वी रेवाळे,समीर गुळेकर, अतिष भाटकर यांना गौरवण्यात आले.

### स्त्री शक्ती सन्मान सोहळा २०२२

समाजातील कर्तृत्ववान महिला ज्या स्वतःच्या पायावर उभे राहून आपले कुटुंब सांभाळतात.तसेच छोटे मोठे व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करतात.अशा ४० महिलांचा सन्मान यावेळी करण्यात आला.या महिलांचा मायेची साडी आणि सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये पल्लवी सनगले,संस्कृती ब्रीद,गौरी भागवत,प्रगती शिंदे, पर्णिका सावंत,मंदा सावंत,मेधा जाधव,शर्वरी कदम,किशोरी नवले,नसरीन खोत,महेश्वरी पांचाळ,समीक्षा कांबळे,रश्मी जंगम,शैलजा भोसले,आराधना जाधव,नेहा मुरकर,प्रियांका जाधव,राखी रसाळ,मधुरा पांचाळ,नमिता चव्हाण,मधुरा भोपळकर,सारिका केळसकर,रिद्धी पंडित,रूपाली चरकरी,कुंदा येडगे,पूर्वा मेस्त्री,दिपश्री किर्डवकर,दिक्षा लिंगायत,अंजली झगडे,पूर्वा जाधव,नयना शिंदे,ममता शिर्के,शेफाली हळदणकर,पूजा शिंदे,श्रुती नागवेकर इत्यादी महिलांचा सन्मान करण्यात आला.

### समाजभूषण पुरस्कार २०२२

ज्यांनी समजासाठी स्वतःला झोकून दिले. अडल्या नडल्या गरजूंना कधी ही गरज भासू दे,लोकांच्या मदतीसाठी कायम तत्पर असणाऱ्या १० सामाजिक कार्यकर्त्यांना शिल्ड आणि शाल देऊन गौरवण्यात आले. यामध्ये मिलिंद खानविलकर,हरिश्चंद्र बंडबे,नासीर हमदारे,अनिल जाधव,समीर शिगवण,अवधूत मेस्त्री,दाजी धावडे,डॉ.अक्षय फाटक,चंद्रकांत बांबाडे,रेहान खान यांचा समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

### पत्रकारांचा सन्मान

लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या पत्रकारांना संविधानाची प्रत देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी प्रकाश चाळके- दै. रत्नागिरी टाइम्स,संतोष पोटफोडे दै.लोकमत,रमेश शिंदे दै. पुढारी,निलेश जाधव- दै. पुढारी हे उपस्थित होते.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा उपाध्यक्ष मुझम्मील काझी व महिला संघटना सदस्या उज्मा मापारी यांनी केले.

कार्यक्रमाला संविधान व लोकशाही प्रेमी जनतेने मोठया संख्येने उपस्थित लावली होती.यावेळी संघटनेचे अध्यक्ष उदय गोताड,संघटन प्रमुख सुहास खंडागळे,उपाध्यक्ष राहुल यादव, मंगेश धावडे,सरचिटणीस डॉ.मंगेश कांगणे,सुरेंद्र काब्दुले, उपजिल्हाध्यक्ष मुझम्मील काझी,जिल्हा संघटक मनोज घुग,रत्नागिरी तालुका संघटक सुकांत पाडाळकर,संगमेश्वर तालुका कार्याध्यक्ष अमित गमरे,संगमेश्वर तालुका सरचिटणीस दैवत पवार,महिला संघटना अध्यक्षा दिक्षा खंडागळे, उपाध्यक्षा अनघा कांगणे,महिला सदस्या उज्मा मापारी,पूजा घुग,श्रुती खंडागळे, महेंद्र घुग सर,नितीन गोताड,वैभव पवार,दिनेश गोताड,अमित गोताड,शुभम गोरुले इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## मंडणगडातील वेळास गाव समुद्र किनारी कासवांसाठी भारतातील पहिले प्रस्तावित राखीव क्षेत्र घोषित

रत्नागिरी:- कासवांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंडणगड मधील वेळास समुद्रीकिनारी कासवांसाठी भारतातील पहिले प्रस्तावित राखीव क्षेत्र घोषित करण्यासाठी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी आज पाहणी केली. या प्रसंगी काही महत्त्वाच्या सूचनाही त्यांनी वनविभागाला केल्या आहेत. तसेच क्षेत्र परवानगीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. व्ही. क्लेमेंट बेन रत्नागिरी (चिपळूण) यांनी वनविभागातील दापोली वनपरिक्षेत्रामध्ये कासवांचे गाव म्हणून प्रसिद्धीस आलेल्या वेळास येथे भेट दिली.

यावेळी श्री. व्ही. क्लेमेंट बेन यांनी समुद्री कासवाचे अंड्यांचे घरटे, समुद्रकिनाऱ्यावरून हॅचरीमध्ये स्थलांतरण न करता, कासव मादीने तयार केलेल्या घरट्याचे नैसगिकरित्या संवर्धन व संरक्षण (इनसिटू) करणेबाबत भर देण्याच्या सूचना परिक्षेत्र वन अधिकारी दापोली यांना दिल्या, त्यानंतर त्यांनी वेळास येथील ग्रामस्थांची वेळास समुद्रकिनारा समुद्री कासव संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून घोषीत करण्याबाबत सविस्तर चर्चा केली.

## गाव विकास समितीचा लोकशाही मेळावा उत्साहात संपन्न

**देवरुख:** गाव विकास समिती रत्नागिरी जिल्हा या संघटनेतर्फे नुकताच लोकशाही मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच संविधान दिन सुध्दा साजरा करण्यात आला. सोबतच छत्रपती संभाजी महाराज निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण ही करण्यात आले.

सलग गेली ४ वर्षे हा लोकशाही मेळावा गाव विकास समिती तर्फे आयोजित करण्यात येत आहे.या लोकशाही मेळाव्यामध्ये ग्रामीण भागातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात येतो.यावेळी अश्या ४० महिलांचा मायेची साडी देऊन सन्मान करण्यात आला. त्याच बरोबर ग्रामीण भागात लोकांसाठी नेहमी धावत जाणाऱ्या १० सामाजिक कार्यकर्त्यांचा समाज भूषण पुरस्काराने गौरव करण्यात आला.

यामध्ये ग्रामीण भागातील सामान्य लोकांत पंचायत राजबाबत आजही जनजागृती झालेली दिसत नाही.जलजीवन मिशन अंतर्गत योजना या काही ठिकाणी पैसे कमाओ योजना होत आहेत,पाणी प्रश्न सोडविण्याकडे लक्ष देण्याऐवजी अंदाजपत्रके अवास्तव वाढवली जात आहेत. त्याकडे लक्ष देऊन खऱ्या अर्थाने लोकांच्या घराघरात पाणी कसे पोहचेल याकडे जिल्ह्याची पालक संस्था म्हणून जिल्हापरिषद प्रशासनाने पाहिले पाहिजे असे वक्तव्य गाव विकास समितीचे संघटन प्रमुख सुहास खंडागळे यांनी लोकशाही मेळाव्यात मार्गदर्शन करताना केले.


संविधान दिन सोहळा व गाव विकास समितीच्या चौथ्या लोकशाही मेळाव्याला मार्गदर्शन करताना सुहास खंडागळे म्हणाले की,७३ व्या घटना दुरुस्ती नुसार ग्रामपंचायत आणि ग्रामसभांना जे अधिकार मिळाले आहेत ते दुर्दैवाने आजही गावातील सामान्य नागरिकांना माहीत नाहीत,लोकांना माहीत होऊ दिले जात नाही. जिल्हा परिषद, पंचायत समिती,ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून सरकारी योजना राबविल्या जात असतात मात्र या संस्थांच्या ठिकाणी बसलेले लोकं लोकाभिमुख कारभार करण्यात अपयशी ठरत असल्याने ग्रामीण भागात सर्वसामान्य लोकांचा विकास रखडला आहे.सामान्य माणसाने आपले हक्क अधिकार समजून घेऊन आता स्वतः यंत्रणेला जाब विचारायला शिकले पाहिजे. किती दिवस,ग्रामसेवक, तलाठी,पोलीस ठाणे ,जिल्हा परिषद येथे जनतेच्या सेवेसाठी बसवलेल्या लोकांना आपण साहेब साहेब म्हणून आपल्याच हक्क अधिकारांचे अवमूल्यन करणार आहोत?कधीतरी त्यांना आपण प्रश्न विचारणार आहोत की नाही?असा सवाल करत आपणच लोकशाहीत मालक आहोत ही भावना सामान्य लोकांनी जपली पाहिजे असे सुहास खंडागळे यावेळी बोलताना म्हणाले.

## मराठी पत्रकार परिषदेच्या ८३ व्या वर्धापन दिनानिमित्त पत्रकारांसाठी परकार हॉस्पिटलमध्ये आरोग्यविषयक तपासणी



**रत्नागिरी –** मराठी पत्रकार परिषदेच्या ८३ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून रत्नागिरी तालुका पत्रकार परिषदेने परकार हॉस्पिटल येथे आरोग्य शिबिराचे आयोजन केले. यामध्ये इसीजी, लिपिड प्रोफाईल आदी तपासण्या करण्यात आल्या.

मराठी पत्रकार परिषदेच्या ८३ व्या वर्धापनदिनानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. त्यानुसार रत्नागिरीतील पत्रकारांचे आरोग्य उत्तम रहावे, या उद्देशाने रत्नागिरी तालुका पत्रकार परिषदेतर्फे परकार हॉस्पिटल येथे आज आरोग्य शिबिर आयोजित केले. डॉ. मतीन परकार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम घेण्यात आला. याला फिजिशियन डॉ. प्रणम केंद्रे, परकार हॉस्पिटलचे सीईओ डॉ.प्रकाश कोळनूरकर, एच आर ॲडमिन डॉ. अनुराधा लेले यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. यावेळी परिषदेच्या राज्य महिला प्रतिनिधी जान्हवी पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष राजेश शेळके, तालुकाध्यक्ष आनंद तापेकर, डिजिटल मीडिया परिषद जिल्हाध्यक्ष मुश्ताक खान, तालुका कार्याध्यक्ष सतीश पालकर, सह सचिव समीर शिगवण, तालुका सचिव, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख जमीर खलफे, केतन पिलणकर, श्रीहरी तांबट आदी उपस्थित होते.



ठाणे महानगरपालिका ठाणे मंडळ अध्यक्ष श्री रोहिदास मुंडे व महिला मोर्चा अध्यक्षा सौ ज्योती राजकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी कॅम्प बेडेकर नगर मध्ये लावण्यात आला होता. या योजनेचा लाभ दिवा शहरातील छोटा मोठा व्यवसाय करणाऱ्या नागरिकांनी घेतला.




डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त सार्वजनिक उत्सव मंडळ दिवा शहर यांच्या माध्यमातून अध्यक्ष एकनाथ भगत व कार्याध्यक्ष दिनेश पाटील यांच्या पुढाकाराने२६ नोव्हेंबर २०२२ रोजी दिवा शहर येथे संविधान दिन रॅली काढण्यात आली.ही रॅली जय भिम स्तंभ पासून सुरू झाली व बी.आर. नगर मार्गे सिद्धार्थ बौद्ध विहार येथे या रॅली ची सांगता झाली.यावेळी मान्यावरांची मनोगते झाली व प्रमुख वक्त्यांची संविधानाबद्दल भाषणे झाली.या रॅली मध्ये मोठ्या संख्येने पुरुष महिला व बालक उपस्थित होते.

# नवीन वर्षात वर्सोवा पुल होणार खुला



## खासदार राजन विचारे यांची माहिती



**ठाणे:** गेल्या अनेक वर्षापासून चर्चेत असलेला वर्सोवा पूल नागरिकांसाठी २० फेब्रुवारी पर्यंत मुंबई ते सुरत असा असलेला ४ मार्गिकेचा पूल खुला करण्याचे आश्वासन खासदार राजन विचारे यांना शुक्रवारी पुलाच्या पाहणी दौऱ्या दरम्यान संबंधित प्रशासनाकडून देण्यात आले आहे. तसेच या मार्गावरून (पी सी यु) पॅसेंजर कार युनिटच्या अहवालानुसार या मार्गावरून दररोज सव्वा लाख गाड्या ये-जा करीत आहेत. तर, या पुलामुळे मुंबई, ठाणे तसेच सुरत कडे जाणाऱ्या प्रवाशांना वाहतूक कोंडीतून सुटका मिळून त्यांचा प्रवास सुखकर होणार आहे.

खासदार राजन विचारे यांनी शुक्रवारी या पुलाची पाहणी करण्याकरिता नॅशनल हायवेचे प्रकल्प अधिकारी मुकुंदा अत्तरडे, वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त प्रकाश गायकवाड, वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे, जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे, नरेश मणेरा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता कांबळे, गटनेते नीलम ढवण, शहर प्रमुख लक्ष्मण कंदलगावकर, जयराम मेसे, शिवशंकर तिवारी, जितेंद्र पाठक, ग्राहक कक्षाचे सदानंद घोसाळकर व इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील वर्सोवा येथील धोकादायक झालेल्या पुलाची तात्पुरती डागडुजी करून त्याठिकाणी ९७० मी. लांबीचा ४ लेन असलेल्या नवीन पुलाचे काम पूर्णत्वास येत आहे. त्याठिकाणी फक्त पूल जोडण्याचे काम बाकी आहे. एकूण मार्ग २.२५ किमीचा आहे.

या वर्सोवा पुलाच्या कामाचे ११ जानेवारी २०१८ रोजी भूमिपूजन होऊन सुद्धा या कामास सुरुवात करण्यात आली नव्हती. त्यासाठी वन खात्याच्या परवानग्या मिळवून घेण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेऊन व संसदेत सतत पाठपुरावा आणि पत्रव्यवहार सुरु होता. त्यामुळेच २९ एप्रिल २०१९ रोजी वन खात्याच्या अंतिम परवानग्या प्राप्त झाल्यानंतर या कामाला सुरुवात करण्यात आली. कोविडमध्ये सुद्धा या रस्त्याच्या मार्गिकाचे काम सुरू ठेवण्यासाठी खासदार राजन विचारे पाठपुरावा करीत होते. आज आपल्या पाठपुरावाला यश आले आहे, अशी माहिती ही खासदारांनी दिली.

### तर सहा महिन्यात पूर्ण होईल

**फाऊंटन हॉटेल समोरील सर्व्हिस रोड रस्ता एमएसआरडीयासी कडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित झाल्या नंतर खासदार राजन विचारे यांनी या रस्त्याच्या कामासाठी शासनाकडून निधी मिळवून दिला. व त्याचे आत्ता काम सुरु झाले असून येत्या ६ महिन्यात या रस्त्याचे काम मार्गी लागणार आहे. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता कांबळे व उप अभियंता सुरेश परदेसी उपस्थित होते.**

# सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे लवकरच भूमिपूजन

ठाणे : ठाणे जिल्हा विठ्ठल सायन्ना सामान्य (शासकीय) रुग्णालयाच्या जागी आता ९०० बेड्सचे सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे येत्या काही महिन्यात भूमिपूजन राहणार आहे. जुन्या आणि जीर्ण झालेल्या इमारती पाडून तेथे नवे सुसज्ज रुग्णालय बांधताना त्या आवारातील ७१ वृक्षांचा अडथळा येणार आहे. त्यापैकी ४७ वृक्षांवर कुऱ्हाड चालवली जाणार आहे. पण, दुसरीकडे त्या बदल्यात मनोरुग्णालयाच्या ठिकाणी असलेल्या रुग्णालयाच्या परिसरात नवीन वृक्ष लावले जाणार आहेत. तसेच २२ वृक्ष त्याच ठिकाणी वाचणार आहेत. पण, तेथे असलेल्या दोन हेरिटेज वृक्षांचे काय करायचे या संदर्भातील प्रस्ताव राज्य शासनाच्या वृक्ष कमिटीकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

ठाणो जिल्हा रुग्णालयाची सध्याची क्षमता ३०० खाटांची असून जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण रूग्णसंख्या दाखल होण्याचा वेग पाहता या जागी दोन बेसमेंट अधिक तळमजला धरून ५७४ खाटांचे सहा मजली स्पेशालिटी उभारण्याला १३ जून २०१९ साली ३१४.११ कोटी रूपयांची मंजूरी मिळाली होती. परंतू नंतर याठिकाणी ९०० खाटांचे १० मजली रु ग्णालय आणि १० परिचारीका प्रशिक्षण केंद्र आणि वस्तीगृहाचा आराखडा तयार करण्यात येऊन या संकल्पचित्राला ९ एप्रिल २०२१ रोजी मान्यता मिळाली. १३ जून २०१९ पासून जिल्हा रु ग्णालयाचा सुपर स्पेशालिटी रूग्णालयाच्या बांधकामाचा सुरू झालेला प्रवास आता अंतिम टप्यात आला आहे. येथील रुग्णालयातील सर्वच विभाग मनोरुग्णालया येथील नवीन वास्तुत तात्पुरत्या रुपात हलविण्यात येणार आहेत. तसेच विविध स्वरुपाच्या परवानग्या देखील घेण्याचे काम युध्द पातळीवर आले आहे. त्यानुसार आता महापालिकेकडे येथे बाधीत होणाऱ्या ७१ वृक्षांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यातील २२ वृक्ष वाचणार असून उर्वरीत ४७ वृक्ष तोडले जाणार आहे. त्यानुसार पालिकेच्या वृक्ष प्राधिकरणच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, ५ डिसेंबर २०२२


## संगीतभूषण पं राम मराठे महोत्सव
## नृत्य गायन आणि सरोद वादनाने रसिक मंत्रमुग्ध




**ठाणे :** नृत्य, गायन, वादन आदी क्षेत्रातील दिग्गज कलाकारांच्या कला सादरीकरणाने पं.राम मराठे संगीत महोत्सवाचे दुसरे पुष्प शनिवारी (०३ डिसेंबर) राम गणेश गडकरी रंगायतन येथे गुंफले.

प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना विधा लाल, नवी दिल्ली यांच्या कथ्थक सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. शास्त्रीय संगीतातील विविध रागांवर आधारित सादर केलेले कथ्थक नृत्य रसिकांची विशेष दाद मिळवून गेले. सायंकाळच्या सत्रात ठुमरी-दादरा-भजन यांचा समावेश असलेली उपशास्त्रीय संगीत मैफल शोभा चौधरी, अपर्णा केळकर, अविराज तायडे यांनी सादर केली. शोभा चौधरी यांनी ठुमरी, तसेच कहेनवा मानो राधाराणी, कजरी, अरे रामा लागो फागुन आदी शास्त्रीय गायनातील रचना सादर केल्या, तर अपर्णा केळकर यांनी हे सुरांनो चंद्र व्हा, विष्णुमय जग या रचनांसह राग सादर केले. तर अविराज तायडे यांनी सादर केलेल्या राम रंगी रंगले, इंद्रायणी काठी या रचनांने कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.

हिंदुस्तानी शास्त्रीय वाद्य संगीतातले एक प्रमुख तंतुवाद्य सरोद. कोलकत्याचे पं तेजेंद्र मुजुमदार यांच्या सरोद वादनाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, उपायुक्त प्रशांत रोडे यांच्यासह माहिती व जनसंपर्क विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## अनेक वर्ष रखडलेला सिंधी कॉलनीचा पुनर्विकास सुरू

**ठाणे :** स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव सुरू असताना ७५ वर्षांपूर्वी सिंधमधून निर्वासित झालेल्या कोपरीतील २०० सिंधी कुटुंबांचे इमारतीतील घराचे स्वप्न पूर्ण होत आहे. कोपरीत पुनर्वसित सिंधी भाषिकांची भव्य इमारत साकारणार असून महाराष्ट्रात प्रथमच होत असलेल्या या प्रकल्पामुळे सिंधी बांधवांच्या अन्य इमारतींच्या विकासाचा मार्गही मोकळा झाला.

भारताच्या विभाजनानंतर कोपरीत सिंधी बांधवांची वसाहत वसविण्यात आली होती. त्यातील छोट्या-छोट्या बराकींमध्ये कुटुंबांना जागा देण्यात आल्या. कालांतराने या ठिकाणी छोट्या इमारती उभारल्या गेल्या. या इमारतींना ४० ते ५० वर्षे पूर्ण झाल्यावर पुनर्विकासाची आवश्यकता होती. मात्र, त्यात अनेक तांत्रिक बाबींचा अडथळा येत होता. त्यामुळे सिंधी बांधवांना जुन्या इमारतीत नाईलाजाने राहावे लागत होते. त्याला कंटाळून अनेक कुटुंबे दुसऱ्या जागी राहावयास गेली होती.

सिंधी वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रश्न भाजपाचे माजी ज्येष्ठ नगरसेवक भरत चव्हाण व भाजयुमोचे प्रदेश सचिव ओमकार चव्हाण यांनी हाती घेतला. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे यांच्यासह नगरविकास विभाग, ठाणे महापालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जात होता. या इमारतींच्या पुनर्विकासातील त्रूटी दूर करण्यात आल्या. त्यानंतर प्रायोगिक तत्वावर जय माँ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या इमारत क्र. १५ चा प्रस्ताव प्रथम तयार करण्यात आला. या इमारतीत २०० कुटुंबे राहत होती. त्या २०० रहिवाशांची बैठक झाल्यानंतर त्यांना संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितल्यानंतर रहिवाशांनी पुनर्विकासाला मान्यता दिली. त्यानंतर प्रकल्पाचे भूमीपूजन करण्यात आले.

### सिंधी कॉलनीतील कुटुंबांना घर निश्चित मिळेल : भरत चव्हाण

सिंधी कॉलनीतील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. इमारत क्र. १५ चा पुनर्विकास हा पथदर्शी प्रकल्प आहे. त्याच धर्तीवर इतर इमारतींचा विकास करण्यात येईल. येत्या काही वर्षांत विस्थापित झालेल्या प्रत्येक सिंधी कुटुंबाला भव्य इमारतीमध्ये हक्काचे घर उपलब्ध होईल. त्यांना कोपरीबाहेर पडावे लागणार नाही, अशी ग्वाही माजी नगरसेवक भरत चव्हाण यांनी दिली.

## माझी वसुंधरा ३.० अभियानातंर्गत पंचमहाभूतावर आधारित केलेल्या कामाचे होणार मूल्यमापन

**ठाणे :** माझी वसुंधरा अभियानातंर्गत पर्यांवरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या विविध योजनांची महापालिकांनी प्रभावीपणे राबविल्यामुळे शासनाच्या पर्यावरण विभागाच्यावतीने माझी वसुंधरा अभियान ३.० ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानातंर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी पृथ्वी, वायु, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचमहाभूताच्या घटकांवर केलेल्या कामांचे मूल्यमापन करण्यात येणार असून या अभियानात नागरिकांना सहभागी करुन घेण्याच्या सूचना ठाणे महापालिका अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे यांनी मंगळवारी झालेल्या कार्यशाळेत सर्व संबंधितांना दिल्या.




शासनाच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी माझी वसुंधरा अभियान ३.० टूलकिटचे सादरीकरण केले असून सदरचे टूलकिट सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्गमित केले आहे. या बाबतची माहिती देण्यासाठी मंगळवारी महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, वृक्ष प्राधिकरण, घनकचरा, पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, शहर विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, माहिती व जनसंपर्क विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे मुख्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पर्यावरणाचे जतन संवर्धन व संरक्षण करण्यासाठी माझी वसुंधरा हा अभिनव उपक्रम पर्यावरण व वातावरणीय बदल हाती घेतला आहे. जो निसर्गाच्या पंचमहाभूते नावाच्या पाचही घटकांवर लक्ष केंद्रीत करतो, त्यात भूमी, जल, वायू, अग्नी, आकाश यांचा समावेश आहे. या उपक्रमातून वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल नागरिकांना जागरुक करुन त्यांना पर्यावरणाच्या सुधारणेप्रती प्रयत्न करण्यात येतात. पंचतत्वावर केलेल्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी अमृत गटासाठी ७६०० व अमृत गट वगळून इतर गटांसाठी ७५०० गुण ठेवण्यात आले असून त्याचे मूल्यमापन करण्यात येणार आहे.

२०२०-२१ मध्ये अमृतसिटी शहरांमध्ये ठाणे शहर हे पहिल्या क्रमांकावर होते तर २०२१-२२ मध्ये ठाणे शहर पाचव्या क्रमाकांवर होते. ठाणे शहराला पहिल्या क्रमाकांवर आणण्यासाठी पंचमहाभूतांवर आधारित घटकांवर लक्ष केंद्रीत करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी या कार्यशाळेत सर्व संबंधितांना दिल्या. या अभियानात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात ओला -सुका कचरा वर्गीकरण, सार्वजनिक वाहतूक, सायकलचा वापर, हवेतील प्रदुषण टाळणे, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन करणे आदी बाबींचे मूल्यमापन होणार आहे.

माझी वसुंधरा ३.० या अभियानातंर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत केलेल्या कामाचे डेस्कटॉप मूल्यमापन ६ एप्रिल २०२३ ते ३१ एप्रिल २०२३ या कालावधीत करण्यात येणार आहे. या मूल्यमापनात यशस्वी ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे फिल्ड असेसमेंट २ ते २५ मे २०२३ या कालावधीत त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात येणार असून त्याचा निकाल पर्यावरणदिनी ५ जून २०२३ रोजी जाहिर करुन बक्षीस वितरण करण्यात येईल.

## संगीतभूषण पं. राम मराठे महोत्सव हा रसिकांसाठी पर्वणी –बेगम परवीन सुलताना

**ठाणे :** संगीत साधनेत यशस्वी होऊन वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी पद्मभूषणपुरस्काराने सन्मानित होणाऱ्या ख्यातकीर्त गायिका बेगम परविन सुलताना यांच्या दमदार गायकीने यावर्षीच्या राम मराठे संगीत महोत्सवाची सुरुवात शुक्रवारी राम गणेश गडकरी रंगायतन येथे झाली. आम्ही कलाकार पुजारी आहोत , रसिक प्रेक्षक आमचे देव असून रसिकांच्या मंदिरात येवून आम्ही कलेची पूजा करीत असतो. ठाणे महापालिकेने संगीतभूषण पं. राम मराठे महोत्सव आयोजित करुन कलावंतांना कला सादर करण्याची संधी दिली त्याबद्दल ठाणे महापालिकेचे त्यांनी आभार व्यक्त करीत हा महोत्सव म्हणजे ठाणेकरांसाठी पर्वणी असल्याचेही त्यांनी सांगितले.

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित संगीत भूषण पं राम मराठे महोत्सवाचा शानदार शुभारंभ शुक्रवारी राम गणेश गडकरी रंगायतन येथे झाला. यावेळी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, आमदार ङ निरंजन डावखरे, अतिरिक्त आयुक्त१संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ संजय हेरवाडे, परिवहन सभापती विलास जोशी, उपायुक्त प्रशांत रोडे,आदी उपस्थित होते.

गेली ४५ वर्षे कथ्थक या नृत्यप्रकाराची अतुलनीय साधना करुन आजवर कथ्थक नृत्याच्या अनेक शिष्या घडविणाऱ्या डॉ. मंजिरी देव यांना रोख रुपये ५१ हजार व सन्मानचिन्ह देवून संगीतभूषण पं. राम मराठे राज्यस्तरीय पुरस्काराने तर गेली २० वर्षे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेणाऱ्या व १० वर्षे अध्यापनाचे काम करीत संगीताची साधना करणाऱ्या दीपिका भिडे- भागवत यांना रोख रुपये २५ हजार सन्मानचिन्ह देवून पं. राम मराठे युवा पुरस्कार पद्मभूषण परवीन बेगम सुलताना यांच्या उपस्थितीत महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. गडकरी रंगायतन ही वास्तू निर्माण झाली त्यावेळी मी या ठिकाणी नृत्य सादर केले आहे. ज्या रंगमंचावर नृत्य सादर केले त्याच रंगमंचावर ठाणे महानगरपालिकेने संगीतभूषण पं. राम मराठे यांच्या नावाने दिलेला पुरस्कार स्वीकारताना मला विशेष आनंद होत आहे असे मंजिरी देव यांनी सांगितले.